# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०—२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल : dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : शसिओ/१८५४

दिनांक : १३.०६.२०१४

प्रति,
मा.प्राचार्य /मान्यताप्राप्त संस्था
अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालये

**विषय: कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा कार्यभार मंजूर करणे व रिक्त पदे भरणेबाबत.**

**संदर्भ: शिक्षण संचालनालय (उच्चशिक्षण) यांचे दि. ६ जून २०१४ रोजीचे परिपत्रक**

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा कार्यभार निश्चित करून पदे मंजूर करण्याबाबतची कार्यवाही ही विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचे स्तरावरून करण्याबाबत मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि. ३१.०५.२०१४ रोजी झालेल्या बैठकीत निश्चित झालेले आहे.

त्यानुसार सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सोबतच्या परिपत्रकाद्वारे कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील कार्यभार निश्चित करून पदे मंजूर करण्याबाबत परिपत्रकाद्वारे कळविण्यांत आलेले आहे. (सोबत प्रत जोडली आहे).

जे कायम विनाअनुदानित महाविद्यालये कार्यभार निश्चित करण्याबाबत टाळाटाळ करतील अशा महाविद्यालयांना विद्यापीठ कायदयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

Web: www.dhepune.gov.in E-mail- dhepune@yahoo.co.in

फोन नंबर- ०२०/ २६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नंबर- ०२०/२६१११११५३,

क्रमांक- युएनआय/बैठक/नावि/विशि-१/ दिनांक ६ जून, २०१४

**परिपत्रक**

प्रति,

कुलसचिव
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

मा. कु... पुणे वि...
आवक क्र.-आ/ 1671
दिनांक - 09/06/14
... दिनांक - 10/06/14
BCOD

Inward No. 2808
Date 10/6/2014
BCUD
University of Pune

**विषय- कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा कार्यभार मंजूर करणे व रिक्त पदे भरणेबाबत.**

संदर्भ- मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३१.०५.२०१४ रोजी झालेली बैठक

उपरोक्त विषयाबाबत सूचित करण्यात येते की, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचा कार्यभार हा प्रचलित शासन निर्णयानुसार विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचेमार्फत निश्चित करण्यात येतो व आकृतीबंधाच्या निकषानुसार पदे मंजूर करण्यात येतात. त्याच धर्तीवर अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा कार्यभार निश्चित करुन पदे मंजूर करण्याबाबतची कार्यवाही ही विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचे स्तरावरुन करण्याबाबत मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३१.०५.२०१४ रोजी झालेल्या बैठकीत निश्चित झालेले आहे.

त्यानुसार सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांना सोबतच्या परिपत्रकाव्दारे कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील कार्यभार निश्चित करुन पदे मंजूर करण्याबाबत परिपत्रकाव्दारे कळविण्यात आलेले आहे. (सोबत प्रत जोडली आहे) तथापि कायम विनाअनुदानित महाविद्यालयाकडून याकामी आवश्यक ते सहकार्य कमी प्रमाणात मिळण्याची शक्यता आहे.

तरी आपल्या स्तरावरुन अशा कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना स्वतंत्र परिपत्रकाव्दारे महाविद्यालयांचा कार्यभार हा संबंधित विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचेकडून निश्चित करुन घेण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच जे कायम विनाअनुदानित महाविद्यालये कार्यभार निश्चित करण्याबाबत टाळाटाळ करतील अशा महाविद्यालयांना विद्यापीठ कायद्यातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल अशा प्रकारच्या कडक सूचना देण्यात याव्यात.

मा. संचालक, मंविविमं
10.6.2014

D.R.(Acad)2
12.6.14

6/6/2014
(डॉ.प्र रा गायकवाड)
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

प्रत- मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

Web: www.dhepune.gov.in E-mail- dhepune@yahoo.co.in

फॅक्स नंबर- ०२०/२६१११९५३,

फोन नंबर- ०२०/ २६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९

दिनांक ६ जून, २०१४

क्रमांक- युएनआय/बैठक/नावि/विशि-१/

**परिपत्रक**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

**विषय- कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा कार्यभार मंजूर करणे व रिक्त पदे भरणेबाबत.**

संदर्भ- मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३१.०५.२०१४ रोजी झालेली बैठक

आपणास विदित आहे की, अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील कार्यभार हा प्रचलित शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात येतो व त्यानुसार पदे मान्य करुन भरण्याची कार्यवाही करण्यात येते.

कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना शासन स्तरावरुन महाविद्यालय सुरु करतांना मान्यता देतांना अशासकीय अनुदानित महाविद्यालयाप्रमाणेच विहित अटी व निकषाची पुर्तता करणे, शासनाचे ध्येय धोरणे राबविणे उदा. समांतर आरक्षण याबाबी अनिवार्य आहेत. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचा गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी पायाभूत भौतिक सुविधा व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या अर्हता प्राप्त करणारे शिक्षकांची नियुक्ती करणे अनिवार्य आहे. सर्व गोष्टीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने सर्व विभागीय सहसंचालक यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा कार्यभार मंजूर करुन देणे आवश्यक आहे.

तरी याबाबत आपल्या स्तरावरुन विशेष शिबिराचे आयोजन करुन त्वरेने तशा मान्यताप्राप्त अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा कार्यभार निश्चित करावा व त्यानुसार बिंदूनामावली प्रमाणित करणे, ना हरकत प्रमाणपत्र देणेची कार्यवाही आपल्या स्तरावरुन तात्काळ करण्यात यावी.

६/६/२०१४

(डॉ.प्र रा गायकवाड)
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

प्रत- मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर